**प्रेस नोट क्र. ८८/२०२४,**
**स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा,**
**सांगली.**
**दिनांक २८.०९.२०२४**

# प्रेस नोट

स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा सांगली यांची कामगिरी

## थ्रिसुर ईस्ट, राज्य - केरळ येथील सोन्याच्या फसवणुकीतील आरोपी अटक

| पोलीस स्टेशन | अपराध क्र आणि कलम | फिर्यादी नाव |
|---|---|---|
| **थ्रिसुर पुर्व, राज्य - केरळ** | गु.र.नं. १००२/२०२४, भा.दं.सं. कलम ४२०, ४०६, ३४ | सदानंदन पोनापन्न |
| **गु.घ.ता वेळ** | **गु.दा.ता वेळ** | **माहिती कशी प्राप्त झाली** |
| दिनांक १६.०४.२०२४ ते ००.०० दिनांक २०.०४.२०२४ रोजी २३.५९ दरम्यान, | दिनांक १०.०६.२०२४ | पोहवा/ ६०७ सुर्यकांत साळुंखे<br>पोकॉ/ १८६२ सुनिल जाधव |
| **कारवाई करणारे अधिकारी आणि अंमलदार** | | |
| मा. संदीप घुगे, पोलीस अधीक्षक, सांगली.<br>मा. रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक, सांगली.<br>**यांचे मागदर्शनाखाली**<br>पोलीस निरीक्षक सतिश शिंदे, स्था. गु. अ. शाखा,<br>सहा. पोलीस निरीक्षक पंकज पवार, स्था. गु. अ. शाखा,<br>सपोफौ अनिल ऐनापुरे, पोहवा/ अमोल ऐदाळे, सुर्यकांत साळुंखे, सागर टिंगरे, हणमंत लोहार, कुबेर खोत<br>पोशि/ सुनिल जाधव, अभिजीत ठाणेकर, विनायक सुतार, रोहन गस्ते स्था. गु. अ. शाखा,<br>पोशि/ कॅप्टन गुंडवाडे, करण परेदशी सायबर पोलीस ठाणे. | | |
| **ताब्यात घेतल्याची वेळ दिनांक दि. २८.०९.२०२४ रोजी** | | |
| **आरोपीचे नांव पत्ता** | | |
| विश्वास रामचंद्र कदम, वय ३४ वर्षे, पत्ता - कौठुळी, ता. आटपाडी जि. सांगली | | |
| **<u>गुन्हयाची थोडक्यात हकीकत :-</u>**<br>यातील आरोपी विश्वास कदम याचे केरळ राज्यात सोन्याचे दागिनेवर हॉलमार्क करणेचे लक्ष्मी नावाचे दुकान आहे. त्यामध्ये त्याची पत्नी स्नेहल कदम व इतर दोघेजण पार्टनर आहेत. गुन्हयातील तक्रारदार यांनी आरोपी विश्वास कदम यांना २२५५.४० ग्रॅम सोन्याचे दागिने ( १ कोटी ८० लाख किंमतीचे) हॉलमार्क करीता आरोपीकडे दिले असता आरोपींने ते विश्वासाने स्वतःजवळ ठेवुन घेवुन हॉलमार्क करुन ते फिर्यादीस परत न देता ते घेवुन पळुन गेला आहे, म्हणुन आरोपींने फिर्यादीचा विश्वास संपादन करुन विश्वासघात केला आहे म्हणुन वरीलप्रमाणे गुन्हा नोंद आहे. | | |

तपासाचे अनुषंगाने आरोपीचा शोध घेण्यासाठी केरळ येथील पोलीस पथक सांगली येथे आले होते. त्यावेळी सदर गुन्हयाच्या अनुशंगाने मा. पोलीस अधीक्षक, संदीप घुगे यांनी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा यांना आरोपीस ताब्यात घेणेबाबत सुचना दिल्या होत्या.

वरीष्ठांचे सुचनेप्रमाणे स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सांगली कडील अधिकारी व अंमलदार यांचे पथक आरोपीचा शोध घेणेसाठी रवाना होऊन आरोपीचा शोध घेत असताना स्था. गु. अ. शाखा, सांगलीचे वरील पोलीस पथकास गुन्हयातील परागंदा आरोपी विश्वास रामचंद्र कदम हा भिवघाट, ता. खानापुर येथे असलेबाबत माहिती प्राप्त झाल्याने तेथे जावुन त्यास ताब्यात घेण्यात आले.

ताब्यात घेतले संशयिताकडे गुन्हयाचे अुनषंगाने विचारपुस करता त्याने सदर गुन्हयाची कबुली दिलेली असुन गुन्हयातील मुद्देमाल त्यांने त्रिशुर, केरळ येथेच विकला असलेबाबत कबुली दिली आहे.

सदर आरोपीस पुढील तपास कामी पोलीस ठाणे, थ्रिसुर ईस्ट, जिल्हा - थ्रिसुर सिटी, राज्य - केरळ पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सदर पोलीस करीत आहेत.

( सतिश शिंदे )
पो.नि.स्था.गु.अ. शाखा, सांगली तथा
जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधीक्षक कार्यालय, सांगली